महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर -४१६ ००४

## परिपत्रक क्र.कोविमं/माध्य. परीक्षा / 2034 / दि .१६/१२/२०२१.

**विषय-** **शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबतचे प्रस्ताव सादर करण्याच्या तारखांबाबत व कार्यपध्दती कळविण्याबाबत.. ..**

**संदर्भ-** **शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२०२/एसडी-२ दि २४.११.२०१७.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सर्व मान्यताप्राप्त शाळा प्रमुखांना कळविण्यात येते की, शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेमध्ये सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबातच्या कार्यपध्दतीबाबत शासनाने उपरोक्त संदर्भिय दि.२४.११.२०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. २४ नोव्हेंबर २०१७ च्या संदर्भिय शासन निर्णयामध्ये नमूद तरतूदीनुसार शैक्षणिक वर्ष सन २०१७-१८ पासून शास्त्रीय कला,चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेमध्ये अतिरिक्त गुणाची सवलत देण्यात येत आहे. सदर शासन निर्णयात नमूद करण्यात आलेल्या **गुणांनुसार शिफारस पत्र शाळांनी पाठवायचे आहे.**

यासंदर्भात आपणास कळविण्यात येते की, **मार्च** २०२२ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) साठी सर्व मान्याताप्राप्त शाळांनी शासन निर्णयाप्रमाणे तसेच मंडळाच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे १५ डिसेंबर २०२१ पर्यंत प्रस्ताव स्विकारले असतीलच असे परिपूर्ण प्रस्ताव खालील दिनांकास मंडळाकडे खालीलप्रमाणे सादर करण्याची कार्यवाही करावी.

परिपूर्ण प्रस्ताव सादर करणेबाबत करावयाची कार्यवाही खालीलप्रमाणे.

| करावयाची कार्यवाही | अंतिम दिनांक |
|---|---|
| शाळांनी विभागीय मंडळाकडे प्रस्ताव सादर करणे. | १५ जानेवारी २०२२ |

**सदर सवलत फक्त नियमित, खाजगी नियमित विद्यार्थ्यांना देण्यात यावी.** पुनर्परीक्षार्थी, श्रेणीसुधार अंतर्गत प्रविष्ठ होणारे विद्यार्थी, तुरळक विषय घेवून प्रविष्ठ होणारे विद्यार्थी यांना लागू राहणार नाही.

१) कला सवलतीचे गुण संबंधित विद्यार्थी अनुत्तीर्ण होत असल्यास उत्तीर्ण होण्यास जितके गुण कमी पडत असतील तितके गुण अनुज्ञेय असलेल्या गुणविभागणीप्रमाणे एक किंवा सर्व विषयात कमाल मर्यादेत विभागून देण्यात येतील उर्वरित शिल्लक गुण संबंधित विद्यार्थ्यांच्या एकूण गुणामध्ये टक्केवारीमध्ये जमा करण्यात येतील.

२) उत्तीर्ण विद्यार्थ्यांना अनुज्ञेय असलेले गुण एकूण गुणांमध्ये स्वतंत्रपणे क्रीडा गुणांच्या प्रचलित पध्दतीनुसार दर्शविण्यात येतील.

३) कला सवलतीचे गुण दिल्यास गुणांची टक्केवारी सरासरी १०० टक्केपेक्षा जास्त होणार नाही.

४) कला सवलतीचे गुण कोणत्याही पारितोषिकासाठी ग्राह्य धरले जाणार नाहीत.

५) मार्च **२०२२मध्ये माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या संबंधित विद्यार्थ्यांनी त्यांचे अर्ज दिनांक १५ डिसेंबर २०२१ पर्यंत त्यांच्या शाळेच्या मुख्याध्यापकांकडे साक्षांकित प्रमाणपत्रासह सोबत जोडलेल्या विहित परिशिष्टामध्ये सादर करावेत अशी प्रचलित कार्यवाही होती. त्यानुसार आपण तशी कार्यवाही केली असेलच.**

६) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या दिनांक ०३-११-२०१८ रोजीच्या शासननिर्णयातील संस्थांकडील संबंधित विद्यार्थ्याचे प्रमाणपत्र त्याच्या शाळेच्या मुख्याध्यापकानी प्रमाणित करुन दिनांक २४.११.२०१७ रोजीच्या शासननिर्णयामध्ये नमूद केलेल्या कलाप्रकाराच्या प्राविण्यानुसार अनुज्ञेय होणाऱ्या गुणांच्या शिफारशीसह संबंधित विभागीय मंडळाकडे शाळेच्या लेटरहेडवर प्रस्ताव सादर करावेत.

ज्या विद्यार्थ्यांना या प्रकारात गुण द्यावयाचे आहेत त्या विद्यार्थ्यांची यादी, विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे प्रमाणित करुन विद्यार्थ्यास किती गुण द्यावेत याची शिफारस करावी व मान्यताप्राप्त संस्थांची यादी त्यासोबत सादर करावी. कोणताही विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता सर्व संबंधितांनी घ्यावी.

क मा प

७) एखादा विद्यार्थी क्रीडा ,शास्त्रीय कला, चित्रकला व लोककलेतील सहभाग यापैकी एकापेक्षा जास्त क्षेत्रात प्राविण्य प्राप्त करत असला तरी , कोणत्याही एकाच क्षेत्रासाठीचे सवलतीचे अतिरिक्त गुण घेण्यासाठी अर्ज करु शकतो.

८) विद्यार्थी इलेमेंटरी परीक्षा उत्तीर्ण असल्याशिवाय इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षेचे गुण मिळणार नाही याची नोंद घ्यावी. दोन्ही परीक्षेचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

९) विद्यार्थ्याने शास्त्रीय कलेच्या नृत्य, गायन, वादन या मध्ये ३ परीक्षा अथवा ५ परीक्षा उत्तीर्ण असेल तर ती सर्व प्रमाणपत्रे सादर करणे अनिवार्य आहे.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

**<u>सर्व शाळाप्रमुखांनी खालील बाबीची नोंद घ्यावी.</u>**

**प्रस्ताव मंडळ कार्यालयास सादर करताना खालील परिशिष्टासह प्रस्ताव सादर करावा.**

**१) शाळेने शिफारस करावयाचा नमुना.**
**२) परिशिष्ट 'अ' ( शास्त्रीय कलेच्या प्रस्तावांकरीता आवश्यक )**
**३) सुधारीत परिशिष्ट ' ब' ( चित्रकलेच्या प्रस्तांवाकरीता आवश्यक )**
**४) एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेच्या प्रमाणपत्रांची प्रमाणित प्रत / इंटरमिजिएट प्रमाणपत्रा अभावी निकालाची प्रमाणित प्रत. सदर इंटरमिजिएट निकालपत्र हे चित्रकला ग्रेड परीक्षेच्या केंद्र प्रमुखांनी प्रमाणित करावे.**

नोंद:- मार्च २०२२ च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेमध्ये विद्यार्थी सवलतीच्या गुणापासून वंचित राहू नये याकरीता एलिमेंटरी व इंटरमिजीएट परीक्षेच्या अनुषंगाने <u>संबंधित विद्यार्थ्यांच्या निकालाची यादी प्रमाणित करुन पात्र विद्यार्थ्यांना, मख्याध्यापक/ केंद्रप्रमुख यांनी प्राप्त निकालावरुन सुधारीत परिशिष्ट ब प्रमाणित करुन प्रस्तावासोबत सादर करण्याची कार्यवाही करावयाची आहे.</u>

## सर्व शाळाप्रमुखांना सूचित करण्यात येते की,

**(अ)चित्रकलेचा प्रस्ताव सादर करताना एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेची दोन्ही प्रमाणपत्रे जोडणे अनिवार्य आहे. प्रमाणपत्रे नसतील तर गुण देण्यात येणार नाहीत याची नोंद घ्यावी.**
**(ब) इंटरमिजिएट प्रमाणपत्रे जर अद्याप प्राप्त झाली नसतील तर मात्र इंटरमिजिएट परीक्षेची निकालपत्रे केंद्रप्रमुखांच्या सहीसह प्रमाणित करुन जोडण्यात यावीत.**
**(क) प्रस्ताव सादर करताना विद्यार्थीनिहाय एलिमेंटरी व इंटरमिजिएटची प्रमाणित केलेली प्रमाणपत्रे/निकालपत्रे जोडण्यात यावीत.**
**( सर्व विद्यार्थ्यांची एकच निकालाची प्रमाणित प्रत लावण्यात येऊ नये असे प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत याची सर्व शाळा प्रमुखांनी नोंद घ्यावी.)**
**तरी उपरोक्त अ.क्र. १ ते ४ मध्ये तसेच (अ) ,(ब) व (क) मध्ये नमुद केल्याप्रमाणेच शाळांनी आपले प्रस्ताव विहीत परिशिष्टांसह निर्धारीत केलेल्या मुदतीत सादर करावेत.**
**(ड)चित्र कलेचे प्रस्ताव सादर करताना प्रत्येक प्रस्तावावर आवेदन प्रत्र क्रमांक नोंद करणे आवश्यक आहे,**

सोबत- १) शाळेने विभागीय मंडळाकडे सवलतीच्या गुणांकरीता करावयाच्या शिफारस पत्राचा नमुना ,
२) परिशिष्ट 'अ'
३) सुधारीत परिशिष्ट ' ब'

प्रति,

मुख्याध्यापक, सर्व मान्यता प्राप्त शाळा,
सातारा/सांगली/कोल्हापूर जिल्हा.

# शाळेने करावयाच्या शिफारशीचा नमुना



शास्त्रीय कला ,चित्रकला/लोककला प्रकारात प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुणांची सवलत देणेबाबत मुख्याध्यापकांनी विभागीय मंडळाकडे शिफारस करावयाच्या पत्राचा **नमुना**

दिनांक :-
जा.क्र.

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ ,
कोल्हापूर वि.मंडळ ,कोल्हापूर.

विषय :- कला विषयातील सवलतीचे वाढीव गुण देणेबाबत.

महोदय,

प्रमाणित करण्यात येते की, आमच्या शाळेतील/विद्यालयातील खालील विद्यार्थी मार्च २०१८ च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ होत आहेत.त्यांनी खालील कला प्रकारात /परीक्षेत प्राविण्य मिळविलेले आहे.

| क्र. | विद्यार्थ्यांचे नांव | माध्यमिक शालांत प्र.परीक्षा बै.क्रमांक | **कला प्रकार** शास्त्रीय गायन,वादन,नृत्य ,चित्रकला व लोककला | उत्तीर्ण वर्ष | प्राप्त श्रेणी/ प्राविण्य. | शासन निर्णयानुसार प्राप्त श्रेणीनुसार अतिरिक्त द्यावयाचे गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

सदर विद्यार्थी/विद्यार्थीनी च्या प्राप्त प्रमाणपत्राची सत्यता पडताळून पाहिलेली आहे .त्यानुसार उपरोक्त तपशीलाप्रमाणे अतिरिक्त गुण देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

मुख्याध्यापक स्वाक्षरी
नांव :-
शाळेचा शिक्का :

शास्त्रीय कलेकरीता आवश्यक परिशिष्ट - अ 385



## “परिशिष्ट अ -”

संस्थेचे नाव ------------------------------------------------------------------------------------- -:

पत्ता ---------------------------------------------------------------------------------------------- - :

सांस्कृतिक कार्य विभाग नोंदणी क्रमांक ------------------ दिनांक --------------------

## प्रमाणपत्र

अ) प्रमाणित करण्यात येते की, कुमार / कुमारी ------------------------------ हा /ही (शास्त्रीय कला प्रकारचे नाव) ---------------------------------------- या कला प्रकारातील ------------------------परिक्षा --------गुणांसह (श्रेणी-------) उत्तीर्ण झाला / झाली आहे. सदर परिक्षा उत्तीर्ण होताना तो/ती ----------इयत्तेमध्ये शिक्षण घेत होता / होती.

ब) प्रमाणित करण्यात येते की, कुमार/कुमारी -------------------------------------- हा / ही मागील ------------ वर्षातील ---------------------- या लोककला प्रकारात एकूण -------------प्रयोगात सहभागी झाला / झाली आहे.

सदर विद्यार्थ्यास / विद्यार्थीनीस मार्च ---------- मधील माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परिक्षेत सवलतीचे वाढीव गुण देण्यास पात्र ठरविण्यात येत आहे.

स्थळ :

दिनांक :

अध्यक्ष / सचिव
संबंधित संस्थेचे नाव
(रबरी शिक्क्यासह)

टिप -“अ” किंवा “ब” यापैकी लागू नसेल ते खोडावे.

चित्रकला करिता आवश्यक परिशिष्ट- ब 383 B (3)



## सुधारीत परिशिष्ट-ब

दिनांक-------------------------

# प्रमाणपत्र

अ) प्रमाणित करण्यात येते की, कुमार / कुमारी------------------------------ हा /ही इंटरमिजीट ड्राईंग ग्रेड परिक्षा सन ------------मध्ये----------श्रेणीने उत्तीर्ण झाला / झाली आहे. सदर परीक्षा उत्तीर्ण होताना तो/ ती------------------ इयत्तेमध्ये शिक्षण घेत होता/होती.

आ) प्रमाणित करण्यात येते की, कुमार/कुमारी----------------------------------------------हा / ही इलिमेंटरी ड्राईंग ग्रेड परीक्षा सन ------------- मध्ये उत्तीर्ण झाला/ झाली आहे.

सदर विद्यार्थ्यास / विद्यार्थीनीस मार्च --------------- मधील माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षेत सवलतीचे वाढीव गुण देण्यास पात्र ठरविण्यात येत आहे.

स्थळ:-

दिनांक:-

**मुख्याध्यापक/केंद्र प्रमुख**
**संबंधित शाळेचे/ केंद्राचे नाव**
**(रबरी शिक्क्यासह)**